पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,
मुंबई-पुणे रस्ता , पिंपरी,
पुणे - ४११ ०१८

दूरध्वनी क्रमांक :२७४२५५११ /१२ /१३ /६७३३३३३३ फॅक्स क्रमांक :०२० -२७४२५६०० /६७३३००००
Emaill -- pcmc@vsnl.com / prashasan@pcmcindia.gov.in Visit us www.pcmcindia.gov.in

# निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट 'अ' मधील ऍनेस्थियालॉजिस्ट(भूलतज्ञ), स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ, अस्थिरोग तज्ञ, मनोविकृती चिकित्सक तज्ञ, गट 'ब' मधील वैद्यकीय अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी आणि पशुवैद्यकीय अधिकारी या संवर्गातील पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरात क्रमांक ८०२/२०१७ चे अनुषंगाने ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना या निवेदनाव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त पदांकरीता **रविवार दि. ०३/१२/२०१७** रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळात लेखी परीक्षा घेण्यात येणार असून त्याबाबतची प्रवेशपत्रे **दि. २४ /११/२०१७** पासून महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. (अपलोड करण्यात येतील.) तरी संबंधित उमेदवारांनी लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावीत व त्यानुसार परीक्षेस उपस्थित रहावे. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना कागदपत्रांच्या छाननीशिवाय लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवारांस लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी दिली किंवा लेखी परीक्षा उत्तीर्ण झाला तरी पदाची विहित अर्हता धारण केली असल्याशिवाय व इतर आवश्यक बाबींची पूर्तता झाल्याशिवाय उमेदवार निवडीस पात्र राहणार नाही. तसेच त्यास निवडीबाबत कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

संकेतस्थळावरुन लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध करुन घेणे व लेखी परीक्षेस वेळेवर उपस्थित राहणे ही संबंधित उमेदवारांची जबाबदारी आहे. संकेतस्थळावरील प्रवेशपत्र पाहिले नाही, डाऊनलोड करणेस अडचण आली इत्यादि कोणतीही कारणे विचारात घेतली जाणार नाहीत. उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यास अडचण आल्यास त्यांनी परीक्षेच्या अगोदर २ दिवस सहाय्यक आयुक्त(प्रशासन), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, महापालिका मुख्य कार्यालय, चौथा मजला, मुंबई-पुणे हायवे, पिंपरी, पुणे १८ यांच्याकडे अर्ज सादर करावा. त्यांना प्रशासन विभाग येथून लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

**दि.०३/१२/२०१७** रोजी लेखी परीक्षा संपल्यावर उत्तरसूची(**Answer Key**) महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर उत्तरसूचीबाबत (**Answer Key**) उमेदवारांना काही आक्षेप असल्यास ते **दि.०६/१२/२०१७** पर्यंत recruitment@pcmcindia.gov.in या ई-मेलवर पाठवावेत. त्यांनतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक प्रशा/१/कावि/ ७९/२०१७
दिनांक २०/११/२०१७